महाराष्ट्र प्रदेश भूदान-समितीचें प्रकाशन ४ थें

# भूदान-पद्यमाला

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. नं. 9२e२

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

REFBK-0007649
REFBK-0007649

मित्रांनो,

प्रचारांत गायनाचें महत्त्व फार मोठें. चार व्याख्यानें जो परिणाम करूं शकणार नाहींत तो एका भावयुक्त पद्य-गायनानें होतो. तें गायन हृदयापासून मात्र झालें पाहिजे. गायनाला स्फूर्ति अर्थवाही शब्दरचनेनें होते. अशा शब्दांचा आणि स्वरांचा मेळ साधला कीं, ऐकणाराचें हृदय उमलूं लागतें. या पद्यावलीनें हृदयें उमलविण्याचें काम व्हावें अशी अपेक्षा आहे.

या छोट्या पुस्तिकेंत, मला बरीं वाटलीं अशा गीतांचा संग्रह केला आहे. अनेकांचीं गीतपुष्पें येथें एकत्र ओंवलीं आहेत. प्रत्येकाचा सुगंध वेगळा, रूप वेगळें. बगीच्यांतील फुलांची शोभा त्यांना नसेल; पण रानफुलांचीसुद्धां शान कांहीं कमी असत नाहीं.

ज्यांच्या ज्यांच्या गीतांनीं ही ' प द्य मा ला ' तयार झाली, त्या सर्वांचे मी आभार मानतों.

ज्यांना कंठ आहे आणि हृदयांत भाव आहे अशांनीं या भूदान-गीतांचा गाऊन प्रचार करावा आणि जनता-हृदयपरिवर्तनाला मदत करावी अशी विनंति करतों.

भाऊ धर्माधिकारी

❀

[ सुधारून वाढविलेली आवृत्ति २ री : सप्टेंबर १९५४ ]

## १. सर्व कल्याणकारी भूदान !

( फेरीचें गाणें )

भूदान-यज्ञ कार्यात — या देशाचें कल्याण ।। धृ० ।।
या देशाचें कल्याण — या दुनियेचें कल्याण
या दात्याचें कल्याण — जो घे त्याचें कल्याण
या धनिकांचें कल्याण — या श्रमिकांचें कल्याण ।।

---

## २. सबै भूमि गोपालकी

सबै भूमि गोपालकी   नव्या युगाचा घोष हाच कीं,
सबै भूमि गोपालकी   ।। धृ० ।।

भारतवर्षामधें यापुढें   ऐष आरामी जिणें नको
—ऐतखाऊ कुणी नको
गरीब-श्रीमंताचा झगडा   भारतांत व्हावया नको
कष्टाची भाकरी सुखाची   कसेल त्याची जमीन ।। १ ।।

देवानें आकाश निर्मिलें   प्रकाश देतो रविभगवान्
धरणीमाता तशी अन्न दे   तिजवर सत्ता कोणाची ?
घाम तिथें आराम शोभतो   }
घाम तिथें सुख—राम नांदतो   } कसेल त्याची जमीन ।। २ ।।

रक्त साचलें तनूभीतरीं   रोग होती परोपरीं
जमिनदार बंधुंनो, अंतरीं   विचार याचा करा तरी
आज ना उद्यां अटळ क्रांति ही   कसेल त्याची जमीन ।। ३ ।।

—शाहीर अण्णा कुलकर्णी

---

अनुक्रम ... विभाग ९२८ क्रमांक ७११५५ नों. दि. ... वाचनालय
... ग्रंथ संग्रहालय ठाणे ... ७७४९ ... शाखा

## ३. पद-यात्रा गीत

( गज्जल )

निघालों पुण्ययात्रेला, प्रभो दे सुयश आम्हांला
प्रभातीं प्रार्थना प्रभुला, मिळूं दे सुयश कार्याला. ।। ध्रु० ।।

पदीं भूदान-यात्रा ही उद्यांच्या भारतासाठीं
नसे ज्या भूमि त्यासाठीं, तसे बेकार त्यासाठीं. ।। १ ।।

उठा रे झोंपलेल्यांनो, जमा या नवजवानांनो,
जमीनीच्या सवालाच्या, नव्या ह्या घोषणा ऐका ।। २ ।।

जमीनी सर्व गांवाच्या, जमीनी राबणारांच्या
जमीनीच्या सवालाच्या, नव्या ह्या घोषणा ऐका ।। ३ ।।

शिवाजीच्या महाराष्ट्रा, तुझें तें शौर्य जगूं दे
नवी ही क्रांति आली रे, पुढें ये, साथ आम्हां दे. ।। ४ ।।

अरे, या क्रांतियुद्धाची, नवाई नीट ध्यानीं घे
अहिंसा शस्त्र गांधींचें, सुनीती ढाल हातीं घे ।। ५ ।।

हरिश्चंद्राचिया देशा, बली कर्णाचिया देशा,
अरे या भूमिहीनांची, मनीची पूर्ण करि आशा ।। ६ ।।

विनोबांच्याच रूपानें उभा हा देव दुनियेचा
तुझ्या दारीं तुझा भाऊ, —तया दे भाग जो त्याचा ।। ७ ।।
नको परतुन त्या लावूं

—शाहीर अण्णा कुलकर्णी

## ४. भूमिदान—अष्टक

नव्या ह्या युगाचा नवा मंत्र जाणा
करा भूमिदाना—करा भूमिदाना
खरा त्याविना मार्ग कांहीं दिसेना
प्रजासूय-यज्ञांत द्या भूमिदाना १

पहा, मानवा, सृष्टिचे अन्य प्राणी
तुझ्यासारखा संग्रही नाहिं कोणी
तुझी संग्रही वृत्ति हें पाप जाण
प्रजासूय-यज्ञांत दे भूमिदान २

जसा प्राणवायू विनामूल्य लाभे
प्रकाशास का मोल द्यावेंच लागे ?
तशी का नको मुक्त भू मानवाला ?
प्रजासूय-यज्ञांत द्या भूमि त्याला ३

जरी हिंदभू जाहलीसे स्वतंत्र
कळेना कुठें चूकलें सौख्यतंत्र
हरायास वैषम्य हा मार्ग जाणा
प्रजासूय-यज्ञांत द्या भूमिदाना ४

नका व्यर्थ चिंता करूं पूढिलांची
खरी काळजी, निर्मि जो त्यास त्यांची
करा काळजी आज ना अन्न ज्यांना
प्रजासूय-यज्ञांत द्या भूमिदाना ५

" मला हें ! मला तें ! " जनीं सोस चाले
अखेरी इथें सर्व टाकून गेले
कुडीलागि जागा पुरे हात तीन
प्रजासूय-यज्ञांत द्या भूमिदान ६

प्रभूनें श्रमाया दिलें सर्व अंग
आम्ही मात्र सारे विलासांत दंग
" श्रमावीण आराम " हें पाप जाणा
प्रजासूय-यज्ञांत द्या भूमिदाना ७

जशीं सर्व सौख्यें मला प्राप्त व्हावीं
तशीं कां न तीं आणिकांना मिळावीं ?
अशा सद्विचारें करी जो प्रपंचा
जगीं धन्य संसार त्याचा सुखाचा ! ८

—शाहीर अण्णा कुलकर्णी

---

## ५. नव्या क्रांतीचं गीत

समदे मिळुन गाउं या । एक नव्या क्रांतीचं गीत गाउं या ।
एका सुरांत म्हणा, एका तालांत म्हणा, जरा जोसांत म्हणा,
भ्रांती-पटल सारुं या । एक नव्या क्रांतीचं गीत गाउं या ॥ ध्रु० ॥

रक्ताचा सडा नको सक्तीचा कायदा !
आपल्याच भावांना मारुन काय फायदा ?
भक्तीचा मळा लावुं या । एक नव्या क्रांतीचं गीत गाउं या ॥ १ ॥

क्रांतीचा नाद दाहि दिशांत घुमतोय् ।
आमचा भारत तिला शांतीनं आणतोय्.
गांधीचा चेला दान धरतीचं मागतोय्.
त्येच्या मागून जाउं या । एक नव्या क्रांतीचं गीत गाउं या ॥ २ ॥

सौराज्य आलं ! पर तें सुराज कां होईना ?
स्वार्थाचा महारोग अजुन का जाइना ?
( वरचढपणाचा का महारोग जाइना )
शेजारिबि नांदतोय् याचं भान राहिना ।
माणुसकीला जागुं या—एक नव्या क्रांतीचं गीत गाऊं या ॥ ३ ॥

संसारी लोकांनो, सावधान ऐका,
रोगाचं मूळ खरं जमलेला पैका
पैका पिकवतीया धरतीच, न्हाई का ?
सारखी वांटुन घेऊं या। एक नव्या क्रांतीचं गीत गाऊं या ॥ ४ ॥

—शाहीर अण्णा कुलकर्णी

---

## ६. धर्मचक्र फिरलें

धर्मचक्र फिरलें पडतां एकाकी पाउलें
वीर विनोबा भूदानाचा घोष करीत चालले
एकाकी पाउलांमागुनि लक्षावधि चालले
पडतां एकाकी पाउलें ॥ १ ॥

खुलल्ीं दहा दिशांचीं दारें
फुलले नवतेजानें वारे
हसले आनंदानें तारे
तृणातृणांतुन कणाकणांतुन मंत्र नवे उमलले
पडतां एकाकी पाउलें ॥ २ ॥

नभाचा कोण धनी एकला
साठविल कोण जगांतिल जला
वायुचा मालक कोणी भला
'सब भूमि गोपालकी' गर्जत जन चालले
पडतां एकाकी पाउलें ॥ ३ ॥

दलितांनींहि दिलें दान याजला
ओळखुनि काळाच्या पाउला
धनिक हो दान कराया चला
भूमिदान हा धर्म युगाचा मर्म खरें यांतलें
पडतां एकाकी पाउलें ॥ ४ ॥

—राष्ट्रसेवादल कलापथक-गीत

---

## ७. भूमंतांनो, श्रीमंतांनो !

( फटका )

भूमंतांनो, श्रीमंतांनो !
भूमि-धनाचें दान करा
भूदानाचा यज्ञ धडकला
आहुति द्याया पुढें सरा ॥ १ ॥
श्रमिक जनांची युगायुगाची
तंद्रा ती रे असे भंगली
सामर्थ्यांची प्रेरक जाणिव
जीवन्मृत जनिं संचरली ॥ २ ॥
दधीचि मुनीच्या देहत्यागें
असुर–सुरांचें युद्ध संपलें
अमीर–गरिबांमधल्या वैरा
होमाया हे ऋषि सजले ॥ ३ ॥
यज्ञांतुनि जें उरेल त्यातें
अमृत जाणुनि स्वीकारा
यज्ञावांचुनि भोग रोग तो
जाणुनि त्यातें धिक्कारा ॥ ४ ॥
भूमी सगळी गोपालांची
भूमिजनांची, ग्रामजनांची
ज्यांचि त्यांजला द्याल ना तरी
अखेर सारी जायाची ॥ ५ ॥
जें जायाचें तें देण्याचें
धैर्य करा, मनिं प्रेम धरा
कण देतां शतगुणित करूनी
उचलुनि देई माय धरा ॥ ६ ॥

—भाऊ

## ८. द्या मजला जमीन !

बटु वामन मी मागतों, द्या मजला जमीन ।
बंधू समजा पांचवा, भूमिहीन जो दीन ॥ धृ० ॥

भारतभूच्या भूस्वामींनो, करा भूमिचें दान ।
वैर विसरुनी गातिल हलपति औदार्याचें गान ।
न्याय कसा हा भुके उपाशी जे कसती जमीन ।
स्वामित्वाच्या हक्कापासुनि वंचित दुबळे दीन ॥
पोशिंदा हा दुनियेचा, काय म्हणावें तुम्हांला !
अश्रु, घाम अन् दैन्य गुलामी यावी त्यांच्या वांट्याला
द्या मजला जमीन० ॥ १ ॥

कपट, द्वेष, हिंसा सोडुनि प्रेममार्ग हा स्वीकारा
मार्ग सनातन प्रेमाचा, मार्ग पुरातन त्यागाचा ।
प्रेममार्ग हा स्वीकारा ॥
स्मरण करा प्रभु रामाचें, हरिचंद्र, शिबि राजाचें ।
उदारबुद्धि कर्णाचें, बलिराजाचें, बुद्धाचें ॥
अनेक साधुसंतांचें, थोर भारतीय परंपरेचें ।
त्यागावांचुन कैसें होईल सार्थक या नरजन्माचें
द्या मजला जमीन० ॥ २ ॥

नवयुग देतें हांक तुम्हांला स्वातंत्र्याच्या पूर्तीची ।
रावरंक हे भेद मोडुनी, ध्वजा उभारूं समतेची ॥
कालाचा हा महिमा जाणुनि, आवाहन हें स्वीकारा ।
भूदानाच्या यज्ञामध्यें स्वार्थबुद्धिचा होम करा ॥
कसेल त्याची जमीन होइल, श्रमप्रतिष्ठा वाढेल ।
नष्टचर्य संपूनि भारतीं, सुखशांती मग नांदेल ॥

सोडा ती जमीन, आतुर भूमिविहीन ।
सोडा मोह सोडा लोभ,
घेऊनि कोठें जाणार ?
मृत्यू येतां जमीन पुरते हात साडेतीन !
द्या मजला जमीन० ॥ ३ ॥

—वसंत नारगोलकर

---

## ९. जागृत व्हावा शेतकरी

( चाल—शूर गडी वीर गडी ० )

शेतकरी कामकरी । जगिं जागृत व्हावा शेतकरी ।
जगिं जागृत व्हावा कामकरी ॥ धृ० ॥
स्वकरेंच करी जें शेतकरी । जग त्यावरती गुजराण करी ।
तोच जरी, तोच जरी नाराज तरी जग काय करी ॥ १ ॥
जगजीवन तो जगतीं जाणा । जगनायक जगताचा राणा ।
त्याविण ना, त्या विण ना जग चालविणें जगिं शक्य कुणा ॥ २ ॥
जगचालक हृदयीं गुप्त वसे । स्वकरें जग सगळें चाळितसे ।
तो कर हा, तो कर हा जगिं शेतकरी हें व्यक्त पहा ॥ ३ ॥
जरि निद्रित जगतीं शेतकरी । तरि जागृत उरती कोण वरी ।
जागृत व्हा, जागृत व्हा, कर सरसावुनि वर, जागृत व्हा ॥ ४ ॥

—नाना बर्वे

---

## १०. भाग अपुला देउं या

( चालः—श्रीद तुझें विसरुनीया० )

सुखसमृद्धी न्याय्य वांटणी शांति समता व्हावया ।
भूदानाचा यज्ञ चालला भाग अपुला देउं या ॥ धृ० ॥

भूमिहीनांना द्यावया जमीन
श्री विनोबांना देउं भूदान
क्रांति घडवूं या शांततापूर्ण
मानवतेचें, भारतभूचें भाग्य तें उजळावया ॥ १ ॥
॥ भूदानाचा यज्ञ० ॥

आपुल्यापाशीं नसेल जरि जमीन
देउं यज्ञांत संपत्तीदान
बुद्धि-श्रम-वेळ करूनिया दान
क्रांति घडवूं या शांततापूर्ण
मानवतेचें, भारतभूचें भाग्य तें उजळावया ॥ २ ॥
॥ भूदानाचा यज्ञ० ॥

—ग. भ. नातू

---

## ११. सारी जमीन गांवाची

( चाल—करूं देत शृंगार )

स्वामित्वाचा मोह सोडणें । हांक विनोबांची ।
सारी जमीन देवाची । सारी जमीन गांवाची ॥ धृ० ॥

वर्ष वर्ष शेतांत राबुनी । घाम गाळुनी देह झिजवुनी ।
असे परी तो मजूर म्हणुनी । दूर राहुनी मालक घेई
रक्कम खंडाची ॥ १ ॥ जमीन देवाची० ॥

कसेल त्याला मान मिळावा । न्याय खरा कां आम्हां न ठावा ।
कशा विषमता कशास हेवा । भूहीनांना भूमि देउं
हो आहुति यज्ञाची ।। २ ।। जमीन देवाची० ।।

भूमिहक्क हा कसा मिळाला । परंपरेनें असाच आला ।
श्रम करुनी का तुम्हां मिळाला । काळाचा ओळखा ओघ हा,
महती कष्टांची ।। ३ ।। जमीन देवाची० ।।

नव्या युगाचा नवा मंत्र हा । दान कशाचें धर्म खरा हा ।
समतेचा सन्मार्ग धरा हा । थोपवेल का सांगा कोणा
भरती क्रांतीची ।। ४ ।। जमीन देवाची० ।।

—सौ. प्रतिभा कोराने

---

## १२. ललकार

गर्जे भूमिदान ललकार...

उठा उठा हो जमीनदार
मोह पुरे अनिवार.....गर्जे०

जमिनीभंवतीं कुंपण कसचें
सोडा निज अधिकार...गर्जे०

आई रुसली, पोरें मुकलीं,
जीवाचा आधार......गर्जे०

बांधव तुमचे किती उपाशी
नका करूं अविचार....गर्जे०

भ्रांत तुम्हांला नसतां कसली
होता कां अनुदार......गर्जे०

हविर्भाग निज अर्पा लौकर
यज्ञ पुरा होणार......गर्जे०

कुदळ-फावडें घेउन हातीं
शेतकरी तैयार.........गर्जे०
जमीन मिळतां प्राणपणानें
शेतामधिं खपणार.........गर्जे०
फुलतिल शेतें, भरतिल पोटें
देश तदा जगणार.......गर्जे०
भूदानानें उजाड भूमि
नंदनवन बनणार.......गर्जे०

—सौ. लीलावती भागवत

---

## १३. प्रेमे देतां द्विगुणित होतें

शिंपीमध्यें जल स्वातीचें
पडतां बनतें मोती त्याचें
मानव ओंजळ भरुनी वेंचे
म्हणे कधीं का कुणा शिंपला
मोती कां द्यावे ?
आपुलें धन कां गमवावें ?

ओथंबे जलभारानें घन
झरझर वर्षे दाहि दिशांतुन
विश्वाला दे नवीन जीवन
म्हणे मेघ का कधीं कुणाला
कां मी वर्षावें ?
आपुलें धन कां गमवावें ?

गोमातेला फुटतो पान्हा
धार काढितो गवळी राणा
दूध पिऊनी हंसतो तान्हा
म्हणे गाय का कधीं कुणाला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे अनुक्रम विभाग क्रमांक नों. दि.

कां मी पान्हावें
आपुलें धन कां गमवावें ?

आम्रतरु फलभारें वाकुनि
लूट फळांची दे भरभरुनी
रसिक हांसतो दुज्या हंसवुनी
म्हणे वृक्ष का कधीं कुणाला
कां मी फळ द्यावें ?
आपुलें धन कां गमवावें ?

दानामध्यें शक्ति अगाधा
दाता मिळवी वैभव शतधा
गाड्डन टाका स्वार्थ-समंधा
प्रेमें देतां द्विगुणित होतें
हें कां विसरावें
कोंडुनी धन कां नासावें ?

धरतीलाही सदैव वाटे
' निष्फळ मी हें जीवन जगते
शेतकरी मज केव्हां भेटे
मुलांलेंकरां घास द्यावया
शेता पिकवावें
आपुलें वैभव अर्पावें '

बंधनांत कां तिला ठेवता ?
अन्नजीवना अपुल्या मुकता
निसर्ग सांगे ऐका आतां
भूमिदान द्या, ऋण देशाचें
वेळीं फेडावें
आपणां, दुसऱ्या जगवावें

—सौ. लीलावती भागवत

---

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों.

## १४. दे दो अब भूमि-अधिकार

दे दो अब भूमी-अधिकार ।
दान करो अभिमानरहित तो होगा बेडा पार ॥ धृ० ॥

जो खेडे वो खाये भैया । सन्त विनोबाने है बतैया ।
जो जोतेगा वो जीतेगा । औरकी होगी हार ॥ १ ॥

भूमीरहित किसान रहेगा । धरतीपर तूफान रहेगा ।
दीप अमनका बुझ जायेगा । फैलेगा अंधकार ॥ २ ॥

लाठी जिसकी भैंस उसीकी । ऐसी कहावत अब न चलेगी ।
दिन चोरी-जोरी के गुजरे । कहता न्याय पुकार ॥ ३ ॥

है सब परमेश्वरकी बस्ती । महेनत जिसकी उसकी हस्ती ।
श्रम-उपासक बनता जाता । है अब कुल संसार ॥ ४ ॥

भूमी का बँटवारा होगा । मुश्किल सारा आसाँ होगा ।
देशमें फिर कोई न रहेगा । भूखा और बेकार ॥ ५ ॥

किसका हक अदा कर देना । है मालिक की किरपा लेना ।
ऋणमुक्तीमें ही तुम मानो । है सच्चा उपकार ॥ ६ ॥

—कवि दुखायल

---

## १५. मैं मिट्टी पाने आया

मैं मिट्टी पाने आया । आया रे भाई ॥ धृ० ॥
जो कुछ तेरे पास नहीं है । देने दिलाने आया रे भाई ॥
मैं मिट्टी पाने० ॥

जे हि विधि तू माटीसे खेला । जीवन तेरा हो गया मेला ।
इस माटीसे कैसे खेलें । तुमको दिखाने आया रे भाई ॥ १ ॥

इस माटीका नाम है धरती । जीवनको जो पावन करती ।
इस माटीका आज तुम्हें मैं । मूल्य बताने आया रे भाई ॥ २ ॥

माँको तुमने दासी माना । कृतघन होकर मर्म न जाना ।
उस माताका फ़र्ज़ मैं तुमको । याद दिलाने आया रे भाई ॥ ३ ॥

स्वारथमें तू बन गया अन्धा । मोहका डाल गलेमें फन्दा ।
दोजखकी* इस जलती आगसे । तुमको बचाने आया रे भाई ॥ ४ ॥

सोनेने तुमको ललचाया । लोभने तेरा मन भरमाया ।
येही सोना दुख सागरमें । तुमको डुबाने आया रे भाई ॥ ५ ॥

अब भी मेरा कहना मानो । अपना पराया हक पहचानो ।
इस हककी नैया लेकर मैं । तुमको तराने आया रे भाई ॥ ६ ॥

बाँटो इस धरतीको बाँटो । थोडा थोडा करके छाँटो ।
मैं धरतीका सबके खातिर । भाग्य बँटाने आया रे भाई ॥ ७ ॥

मैं कहता मिट्टीसे खेलो । खेलमें जो दुख आये झेलो ।
दुख से सुखका दर्शन होगा । ऐसा जताने आया रे भाई ॥ ८ ॥

आत्मरूप बन प्रेम बढाओ । प्रेमके गीत सदा ही गाओ ।
ये ही गीत विनोबा बनकर । आज मैं गाने आया रे भाई ॥ ९ ॥

—कवि दुखायल

* दोजख = नरक

## १६. महेनत सेवा राम की

महेनत सेवा राम की । महेनत भक्ती राम की
महेनत पूजा राम की ॥ धृ० ॥

जागो प्यारे भारतवाले । हाथोंवाले पाँवोंवाले
खोलो बन्द दरोंके ताले । अब न घडी आरामकी ॥ १ ॥

महेनत यमुना गंगा जानो । महेनत काशी काबा मानो ।
धूम बडी इस धाम की ॥ २ ॥

महेनत जीवन की निर्माता । महेनत ही रिधिसिधिकी दाता
कहती गीता श्यामकी ।। ३ ।।

महेनत जैसी औषध नाही । तनमन का सुख महेनत मांही ।
चीज बडी है काम की ।। ४ ।।

महेनत दान करो रे भाई । संत विनोबाकी ये दुहाई ।
श्रद्धा यह बेदाम की ।। ५ ।।

—कवि दुखायल

---

## १७. कायरका नहीं काम

वीरोंकी यह बाट है भाई । कायरका नहीं काम रे ।
सरपर बाँध कफन जो निकले । बिन सोचे परिणाम रे ।।
कायरका नहीं काम ।।

दिल का घोडा कसकर दौडा मार चला मैदान ।
चलता मुसाफिर ही पायेगा मंजिल औ' मुकाम रे ।। १ ।।

दीपशिखा से लिपट चला आतुर जलनेको पतंगा ।
तन तो जलकर राख भया पर मनको मिला आराम रे । ।। २ ।।

जिनको लगी सेवा की लगन कुरबानी का रंग चढा ।
ऐसे मस्त कहाँ लेते हैं सुख और चैन का नाम रे ।। ३ ।।

हिम आतप वर्षा भी जिसके बढते पैर न रोक सके ।
हरि के काज बिना साधे उस संत को कब विश्राम रे ।। ४ ।।

आओ साथी साथ चलें इस साथ से देशके साथ रहें ।
संत विनोबा माँग रहा तेरा जीवनधन निष्काम रे ।। ५ ।।

—कवि दुखायल

---

१०७०९ मां. क्र. १०१ ७२०७ १५४५४५

## १८. ज़मीन दो, ज़मीन दो !

सुरम्य शांति के लिये ज़मीन दो, ज़मीन दो,
महान् क्रांति के लिये, ज़मीन दो, ज़मीन दो ॥

: १ :

ज़मीन दो कि देशका अभाव दूर हो सके,
ज़मीन दो कि द्वेषका प्रभाव दूर हो सके,
ज़मीन दो कि भूमिहीन लोग काम पा सकें,
अुठा कुदाल बाजुओं का जोर आजमा सकें
महाविकास के लिये ज़मीन दो, ज़मीन दो,
नये प्रकाश के लिये ज़मीन दो, ज़मीन दो ॥

: २ :

ज़मीन दो, समाज से कडी पुकार आ रही,
ज़मीन दो कि अेक माँग बार-बार आ रही,
ज़मीन मातृ-रूपिणी पुनीत है, पवित्र है,
ज़मीन वारि-वायु का समान ही चरित्र है
पुनीत कर्म के लिये ज़मीन दो, ज़मीन दो,
नवीन धर्म के लिये ज़मीन दो, ज़मीन दो ॥

: ३ :

ज़मीन दो कि शांतिसे नया समाज ला सकें,
ज़मीन दो कि राह विश्व को नयी दिखा सकें
ज़मीन दो कि प्रेम से समत्व-सिद्धि पा सकें,
ज़मीन दो कि दान से कृपाण को लजा सकें
सुरम्य शांति के लिये ज़मीन दो, ज़मीन दो,
महान् क्रांतिके लिये ज़मीन दो, ज़मीन दो ॥

—दिनकर

श्री प्रेम संग्रहालय

# फेरींतील घोषणा

[ महाराष्ट्राच्या जिल्ह्या जिल्ह्यांत आज भूदानाची चळवळ पसरत आहे. मुलें, मुली, तरुण आणि वृद्ध स्त्री-पुरुष तींत भाग घेऊं लागले आहेत. प्रभात-फेरी, सायंफेरी, मिरवणूक इ० निघतात. त्यांमध्यें या चळवळीच्या स्वरूपाला साजेल अशा ठरीव घोषणाच दिल्या जाव्यात अशी प्रदेश भूदान-समितीची अपेक्षा आहे. अनेक दिवस चिंतन करून व अनुभव घेऊन खालील घोषणा ठरविण्यांत आल्या आहेत. सर्वांना त्यांचा उपयोग होईल. ]

**भारत माता की जय ।**

**भूमाता की जय ।**

**सारी जमीन देवाची ।**

**जमीन सारी गांवाची ।**

**पिकावर सत्ता राबणारांची ।**

**भूदान-यज्ञांत जमीन द्या ।**

**भूदान–यज्ञाचा विजय असो ।**

**दुःखी जनता अब न सहेगी, धन और धरती बँटके रहेगी ।**

❀

विचाराचें सामर्थ्य मोठें !

साप्ताहिक

# भूदान-यज्ञ

विचारक्रांतीला मदत करून नव्या येणाऱ्या समाजक्रांतीची भूमिका तयार करीत आहे. सर्वोदयभक्तांनीं, अभ्यासकांनीं, निरीक्षकांनीं आणि इतर सामान्यांनींसुद्धां हें साप्ताहिक वाचावें, वाचून दाखवावें.

दर गुरुवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी ३ रुपये

[ व्ही. पी. केली जात नाहीं ]

## इतर भूदान-वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| १. विनोबांचें भूदान-आंदोलन | ... | किं. ३ आणे |
| २. भूदान-यज्ञामागील भूमिका ( ले.–शंकरराव देव ) | ... | ,, १ आणा |
| ३. शंका-समाधान | ... | ,, ४ आणे |
| ४. भूदान-पद्यमाला | ... | ,, ३ आणे |
| ५. जीवनदान ( ले.–जयप्रकाश नारायण ) | ... | ,, २ आणे |

प्रदेश व जिल्हा भूदान समित्या, भूदान-कार्यकर्ते आणि पुस्तक-वि[ल्क्रेते] यांनाच फक्त २५ टक्के कमिशन मिळेल. मात्र कमींत कमी १०० प्रत (सरमिसळसुद्धां) मागविल्या पाहिजेत.

मागविण्याचा पत्ताः— ३६१ सदाशिव, पुणें २.



प्रकाशक : सदाशिव जगन्नाथ ऊर्फ भाऊ धर्माधिकारी, सहमंत्री, महाराष्ट्र सेवा संघ, ३६१ सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक : रा. ना. सरनाईक, सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार, पुणें २.